# मेट्रोचे आणखी चार डबे मुंबईत

## सारिपूतनगर येथील तात्पुरत्या कारशेडच्या जागेवर जोडणी सुरू

म. टा. प्रतिनिधी



**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेवरील पहिल्या मेट्रो गाडीचे उर्वरित चार डबेही मुंबईत दाखल झाले आहेत. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास हे डबे मुंबईत आले. त्यामुळे आता मेट्रो ३ची आठ डब्यांची संपूर्ण गाडी मुंबईत आली आहे. हे डबे जोडणीचे काम सारिपूतनगर येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) सुरू केले आहे. त्यामुळे लवकरच मेट्रो ३ च्या पहिल्या गाडीच्या मार्गिकेवरील चाचण्यांना सुरुवात होणार आहे.

आंध्रप्रदेशातील श्री सिटी येथील कारखान्यात मेट्रो ३च्या डब्यांची निर्मिती करण्यात आली आहे. तेथून ६४ चाकी ट्रेलरवरून हे आठ डबे मुंबईत आणण्यात आले आहेत. यातील पहिले चार डबे मंगळवारी पहाटे मुंबईत दाखल झाले होते. तर पहिल्या गाडीचे उर्वरित चार डबे दहा दिवसांचा प्रवास करून शुक्रवारी मुंबईत पोहोचले. सुमारे १४०० किलोमीटरचा प्रवास करून हे डबे मुंबईमध्ये आले. सारिपूतनगर येथील तात्पुरत्या कारशेडच्या जागेवर या डब्यांची पुढील दोन दिवसांत जोडणी करून एक मेट्रो गाडी साकारली जाणार आहे. ॲक्वा ग्रीन आणि बेज (फिका पिवळा) रंगातील ही गाडी असेल. त्यानंतर एमएमआरसीएलकडून गाडीची तपासणी केली जाणार आहे. या गाडीच्या प्रत्येक डब्याचे वजन ४२ टन आहे. खास प्रकारच्या ६४ चाकी ट्रेलरवरून हे डबे मुंबईत आणण्यात आले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मेट्रो ३ मार्गिकेवरील गाड्यांची सारिपूतनगर येथील तात्पुरत्या कारशेडच्या जागेपासून ते मरोळ नाका मेट्रो स्थानकापर्यंतच्या ३ किमी अंतराच्या ट्रॅकवर चाचण्या घेतल्या जाणार आहेत. या महिन्याच्या अखेरीस चाचण्यांना सुरुवात होण्याची चिन्हे आहेत.

मेट्रो ३चे कारशेड आरे येथे हलविल्यानंतर कारशेड उभारणीला वेग आला आहे. एमएमआरसीएलकडून जानेवारी २०२४ पर्यंत मेट्रो ३चा पहिला टप्पा सुरू करण्याचा प्रयत्न आहे. मरोळ ते बीकेसी या मार्गावर पहिल्या टप्प्यात ही गाडी धावेल. त्यादृष्टीने एमएमआरसीएलने प्रयत्न सुरू केले आहेत.